ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# कॉम्रेड एस.व्ही.देशपांडे व कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांचे अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षातील योगदान



प्रा. विधाटे गणेश शंकर
इतिहास विभाग, एस.एस.जी.एम. कॉलेज, कोपरगाव, जि. अहमदनगर.

महत्वाचे शब्द : गिरणी कामगार, कम्युनिस्ट इंटरनॅशनल, पब्लिक सेफ्टी ॲक्ट, मार्क्सवाद, युगांतर, समाजवाद, तिरंगी तात्यावाद.

## शोधनिबंधाचा उद्देश :

१. कॉम्रेड एस.व्ही.देशपांडे व कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांना कैद करून अहमदनगर जिल्ह्यमध्ये ठेवण्याच्या ब्रिटिश सरकारच्या हेतूचा मागोवा घेणे
२. कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रसार करण्यासंदर्भातील भूमिकेचा मागोवा घेणे
२. कॉम्रेड एस.व्ही.देशपांडे यांचे नगर शहरात कम्युनिस्ट पक्षाची विचारसरणी रुजविण्यामागच्या भूमिकेचा आढावा घेणे
३. कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांचे शेवगाव तालुक्यात कम्युनिस्ट विचारसरणीच्या प्रसारसंदर्भातील कार्याचा आढावा घेणे
४.कॉम्रेड एस.व्ही.देशपांडे व कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांचे शेतकरी व सावकारशाही विरोधी चळवळीतील कार्याचा आढावा घेणे

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे त्यामध्ये कॉम्रेड एस.व्ही.देशपांडे व कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांचे चरित्रग्रंथ, गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र साप्ताहिक युगांतर, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने प्रकाशित केलेले श्रीकांत लाड संपादित 'भारतीय कम्युनिस्ट पक्षाची ५० वर्षे' हा संदर्भ ग्रंथ, कॉम्रेड मालिनी तुळपुळे यांचा कॉम्रेड वसंतराव तुळपुळे कार्य व परिचय या संदर्भ ग्रंथांचा वापर केला आहे

## प्रस्तावना :-

शेतकऱ्यांचा जिल्हा म्हणूनओळखल्या जाणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाची चळवळ बळकट करण्यामध्ये शेतकरी वर्गाचा मोठा वाटा आहे. ‘शेतकरी आम्हीं झालो समदं लाल बावटेवालं’ असे जिल्ह्यातील कम्युनिस्ट विचारांचे शेतकरी व त्यांचे नेते अभिमानाने म्हणत असत कम्युनिस्ट पक्षाचे क्रांतिकारी तत्त्वज्ञान अह्मदनगर

जिल्ह्यातील प्रत्येक खेड्यात पोहचविण्यात लाल बावट्याच्या शेतकऱ्यांनी व त्यांच्या पुढाऱ्यांनी केलेली कामगिरीमहत्वाची समजली जाते. जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीची चळवळीची राष्ट्रीय आंदोलनाशी कम्युनिस्टांनी सांगड घातलेली दिसूनयेते.पक्षातील बहुतेक नेते व कार्यकर्ते हे पूर्वीचे कॉंग्रेसचे कार्यकर्तेहोते. कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून त्यांनी वर्गीय प्रश्न हाताळले असल्याने शेतकरी-कामगारांच्या मोठमोठ्या चळवळी उभारून त्या यशस्वी करणे अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांना शक्य झालेले दिसते.मात्र पुढे कॉंग्रेस मंत्रीमंडळाच्या कार्यपद्धतीमुळे स्वातंत्र्यलढ्यात सामील झालेल्या निरनिराळ्या मतांच्या कार्यकर्त्यांमध्ये असलेली मतभिन्नता अधिक उग्र बनलेली दिसून येते.या कार्यकर्त्यांमध्ये कॉम्रेड एस.एस.मिरजकर व कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे यांनी जिल्ह्यातील कॉंग्रेस नेतृत्वाशी कधी सहकार्य तर कधी संघर्षाची भूमिका घेऊन कम्युनिस्ट पक्षाचा नगर जिल्ह्यात प्रसार करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावलेली दिसून येते

## १. कॉम्रेड एस.एस.मिरजकर व कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे यांना अटक व नगर जिल्ह्यात स्थानबद्ध:-

इ.स. १९३४ साली गिरणी कामगारांच्या प्रश्नावर कम्युनिस्टांनी सार्वत्रिक संपाची हाक दिली २३ एप्रिल १९३४ रोजी मुंबईच्या गिरणी कामगारांनी पुकारलेल्या या संपास दिल्ली,अहमदाबादच्या गिरणी कामगारांनी संप करून साथ दिली.[१] मात्र हा संप ज्या दिवशी सुरु होणार होता त्याच दिवशी प्रमुख कम्युनिस्ट पुढाऱ्यांची धरपकड करण्यात आली ब्रिटिश सरकारने संमत केलेल्या नागरी सुरक्षा कायद्यानुसार प्रमुख कम्युनिस्ट नेत्यांची धरपकड करण्यात आली.या काळात कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या सातव्या जागतिक परिषदेसाठी सिंगापूर मार्गे रशियाला जायला निघालेल्याकॉम्रेड एस.एस.मिरजकर व कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे यांना सिंगापूरहून ब्रिटिश सरकारच्या गुप्तहेरांनी अटक केली.त्यापैकी कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांना अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव येथे[२] तरकॉम्रेड एस.व्ही. देशपांडे यांना अहमदनगर शहरातील भिंगार येथे १९३४ साली ब्रिटिशांनी स्थानबद्ध केले.[३]कॉम्रेड एस.एस.मिरजकर व कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे यांना अहमदनगर जिल्ह्यात स्थानबद्ध करण्यामागे त्यांचे खच्चीकरण करून राजकीय उत्साह नष्ट करणे व कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीला पायबंद घालणे ही ब्रिटिशांची भूमिका होती. परंतु या दोन कम्युनिस्टांनी कायद्याच्या चौकटीत राहून कम्युनिस्ट तत्वज्ञानाचा अहमदनगर जिल्ह्यात प्रसार करून ब्रिटिशांच्या भूमिकेला आव्हान देण्याचे काम सुरु केले

## २. कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे यांचे नगर शहरात कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीचा प्रसार करण्यासंदर्भातील योगदान-

प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये एव्हाना कॉम्रेड एसएस.मिरजकर व कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे या दोन क्रांतिकारकांना पकडून आणले ह्या वार्तेने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली. त्यांना पाहण्यासाठी नगर शहर व शेवगाव मध्ये लोकांची झुंबड उडाली. सरकारच्या आपल्याला स्थानबद्ध करण्याच्या हेतूने परिचित असलेल्या या दोन कम्युनिस्टांनी आलेल्या परिस्थितीला धीरोदात्तपणे तोंड दिले.

अहमदनगर शहरात विजनवासात असलेल्या कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे यांच्या सहवासात आलेली कॉम्रेड बाबा गोसावी, कॉम्रेड भाऊ क्षीरसागर, भाई राम निसळ इ. मंडळी समाजवादी विचारांकडे आकृष्ट होऊ लागली. कॉम्रेड देशपांडे व नगर तालुक्यातील घोसपुरीचे रहिवासी कॉम्रेड डी बी. कुलकर्णी यांनी कॉम्रेड बाबा गोसावी, कॉम्रेड भाऊ क्षीरसागर, कॉम्रेड विनायकराव भुस्कुटे यांच्या मदतीने'तरुण मित्र मंडळ' ही संघटना स्थापन केली. कॉम्रेड देशपांडे व कॉम्रेड डी.बी. कुलकर्णी हे तरुण मित्र मंडळाच्या सभासदांची मार्क्सवादी अभ्यास शिबीरे घेण्याकरिता पुण्याहून कॉम्रेड विष्णुपंत चितळे यांना बोलवत असत. पुढे या दोघांनी नगर शहरात कम्युनिस्ट पक्षाचा सेल स्थापन केला.[४]तरुण मित्र मंडळाच्या

कार्यकर्त्यांच्या मदतीने कॉम्रेड देशपांडे व कॉम्रेड डी.बी. कुलकर्णी यांनी कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांच्या सभा नगर येथील गांधी मैदानात भरविल्या होत्या.[५] त्या माध्यमातून ते तरुण वर्गात कम्युनिस्ट विचारांचे बीजारोपण करू लागले होते.

कम्युनिस्ट तत्वज्ञानाचा जनतेत प्रसार करण्याकरिता कॉम्रेड एस.व्ही.देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉम्रेड डी बी. कुलकर्णी, बाबा गोसावी, कॉम्रेड विनायकराव भुस्कुटे यांनी१९३६ साली 'युगांतर साप्ताहिक सुरु केले. कॉम्रेड डांगे यांचे 'क्रांती' हे साप्ताहिक बंद पडल्यावर त्यांनी युगांतर साप्ताहिकास कम्युनिस्ट पक्षाचे अधिकृत वर्तमानपत्र म्हणून मान्यता दिली.[६] युगांतर बरोबरच 'विद्यार्थी जगत', 'प्रेस कामगार' ही साप्ताहिकेही कामगार व विद्यार्थी वर्गामध्ये जागृती निर्माण करण्याकरिता सुरु झाली होती. परंतु ती फार काळ टिकली नाहीत. कॉम्रेड एस.व्ही.देशपांडे हे युगांतर मधूननियमितपणे स्फुटविचार लिहित असत. युगांतरमधून'मार्क्सवादाची मुलतत्वे' ही लेखमाला लिहून त्यांनी कॉंग्रेसच्या भांडवलशाही राजकारणाची चिरफाड केली होती. 'समाजवाद' व 'तिरंगी तात्यावाद' या त्यांच्या दोन लेखमाला फार गाजल्या. मुंबई व सोलापूर येथील कामगार चळवळीचे वृत्त युगांतरमधून प्रसिद्ध होत असे.[७]

आझाद हिंद साप्ताहिकाचे संस्थापक राम निसळ यांनी कॉम्रेड विनायकराव भुस्कुटे व कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे यांची गाठ घालून दिली या दोघांच्या भेटीमुळे अहमदनगरच्या राजकारणाला विधायक दिशा मिळाली टिळकनगर, हरेगाव येथील साखर कारखान्यातून काम करणाऱ्या कामगारांची संघटना बांधण्याचे काम कॉम्रेड भुस्कुटे यांनी हाती घेतले होते. मात्र संघटनेतील मार्गाबद्दल कॉम्रेड भुस्कुटे व रावसाहेब पटवर्धन यांचे वैचारिक मतभेद वाढू लागलेया दोघांना एकत्र काम करता येईना तेव्हा कॉम्रेड देशपांडे यांनी'युगांतर' साप्ताहिकाची संपादकपदाची जबाबदारी कॉम्रेड बाबा गोसावी यांच्याकडून काढून घेऊन ती कॉम्रेड विनायकराव भुस्कुटे यांच्याकडे दिली कॉम्रेड देशपांडे यांच्या सहकार्य व मार्गदर्शनाचा कॉम्रेड भुस्कुटे यांना लाभ होऊन ते पुढे अहमदनगर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी म्हणून निवडून आले या काळात युगांतर आणि विनायकराव भुस्कुटे यांचा खर्च कॉम्रेड देशपांडे यांनी त्यांच्या६० रू. सरकारी भत्ता व शिकवण्यातून मिळणाऱ्या पैशांमधून भागविण्याचे औदार्य दाखविले.[८]

कॉम्रेड देशपांडे भिंगारला स्थानबद्धतेत असतांना त्यांना कमलादेवीचट्टोपाध्याय, अजय घोष, कॉम्रेड डांगे, कॉम्रेड बाबुराव रणदिवे, कॉम्रेड लालजी पेंडसे भेटायला येत असत. नगर शहरात 'प्रेस कामगार' साप्ताहिकाची सुरूवात करणारे कॉम्रेड डी.के.ढोले अहमदनगरला येऊन स्थायिक झाले. ते नगर मध्ये प्रेस कामगार युनियन चालवत होते.[९]कॉम्रेड देशपांडे यांच्या भिंगारमधीलवास्तव्या दरम्यान कॉंग्रेस मंत्रीमंडळ अधिकारारूढ झाले होते.कॉंग्रेसच्या पहिल्या मंत्रिमंडळात नगर जिल्ह्यातील आमदार लक्ष्मणराव पाटील हे मंत्री म्हणून निवडून आले कॉम्रेड देशपांडे यांनी राम निसळ यांच्या सहकार्याने त्यांचा भिंगार येथे सत्कार घेऊन निर्बंध असतानाही उत्स्फूर्त भाषण केले. ब्रिटिश सरकारने ही सभा संपताच कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे यांना अटक केली त्यामुळे नगरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रभर हल्लाकोळ झालापुढे कॉंग्रेस पुढाऱ्यांनी नामदार मुन्शी यांच्याबरोबर बोलणी करून कॉम्रेडदेशपांडे यांची सुटका केली.इ.स. १९३८ साली स्थानबद्धतेमधून सुटका झाल्यावर कॉम्रेड देशपांडे यांनी भिंगारमध्ये दोन निवडणुका लढवल्या परंतु त्यांच्या कॉंग्रेसशी समांतर प्रचार कार्यामुळे ह्या निवडणुकात कॉंग्रेस पुढाऱ्यांनी त्यांना निवडून येऊ दिले नाही.[१०]

### ३. कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांचे शेवगाव तालुक्यात कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीचा प्रसार करण्यासंदर्भातील योगदान-

कॉम्रेड एस.एस.मिरजकर हे कम्युनिस्ट पक्षातील बडे प्रस्थ होते. शेवगाव मध्ये स्थानबद्धतेमध्ये असतांनाकॉम्रेड एस.एस.मिरजकर यांनी शेवगावमध्ये तरुण मंडळींना एकत्र करून त्यांना राजकारणाची दीक्षा देण्यास सुरुवात केली राजकीय चळवळ करण्यास कॉम्रेड मिरजकर यांना मनाई होती. मात्र त्यांनी त्यातूनही मार्ग काढला शेवगावला कॉंग्रेस कमिटी नव्हती. बाळासाहेब भारदे व डॉ. रसाळ या तरुण कॉंग्रेस कार्यकर्त्यांना हाताशी धरून त्यांच्या मदतीने कॉम्रेड

मिरजकर यांनीशेवगावमध्ये कॉंग्रेसची कमिटी स्थापन केली.कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांच्या सहवासात बाळासाहेब भारदे व त्यांचे सहकारी राष्ट्रीय आंदोलनात उतरले. कॉम्रेड एस.एस.मिरजकर अहमदनगरला आल्यावर अच्युतराव पटवर्धन यांच्या वाड्यात उतरत असत. त्यामुळे या दोघांचे चांगले संबंध होते.परंतु ते फार काळ टिकले नाहीत. कारण स्वातंत्र्य चळवळीची उभारणी चालू असतांना कॉंग्रेसच्या नेतृत्वावर व कार्यक्रमावर कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून कॉम्रेड एस.एस.मिरजकर थेट टीका करत असत. थोड्याच दिवसात अहमदनगरहून कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांची सुटका झाली. गृहमंत्री मुन्शी यांनी१९३८ साली कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांची स्थानबद्धतेमधून सुटका झाली. यामागे अच्युतराव पटवर्धन यांचा हात असावा असा कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांचा संशय होता.[११]

## ४. स्थानबद्धतेमधून सुटका झाल्यानंतरचे नगरजिल्ह्यातील शेतकरी व सावकारशाही विरोधी चळवळीतील कार्य व कॉंग्रेसशी संघर्ष:

१९३८ साली कॉम्रेड मिरजकर व कॉम्रेड देशपांडे यांची अहमदनगर जिल्ह्यातील स्थानबद्धतेतून सुटका झाली. पुढे हे दोघेजण अहमदनगरला रहावयास आले. कॉ. एस.व्ही. देशपांडे व कॉ. एस.एस. मिरजकर हे कॉ. डी. बी. कुलकर्णी, कॉ. विनायकराव भुस्कुटे यांच्यासह कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळू लागले व त्यांना संघटित करू लागले. सावकारशाही नष्ट करा, कुळांना जमिनीची मालकी मिळवून द्या, जमीन धारणेची कमाल मर्यादा वाढवा, वरकड जमिनी भूमिहिनांना द्या इत्यादी प्रश्न ह्या परिषदांमधून मांडले जात असत.[१२]

बाळासाहेब खेर मंत्रीमंडळ अधिकारावर आल्यावर ह्या प्रश्नावर नगर जिल्ह्यात पहिली परिषद अकोले येथे झाली. या परिषदेच्या विषय नियामक समितीत सावकारी व्याजावर नियंत्रण घालण्यासंबंधीचा ठराव कम्युनिस्टांनीमांडला. ठरावावर तीव्र मतभेद झाले. खुल्या अधिवेशनात कॉ. एस.व्ही. देशपांडे व कॉ. एस.एस. मिरजकर यांना बोलू द्यावयाचे नाही असे कॉंग्रेस पुढाऱ्यांनी ठरविले. पण त्यांचा हा डाव अयशस्वी झाला. सभेस जमलेल्या २० हजार शेतकऱ्यांनी कॉ. एस.व्ही. देशपांडे व कॉ. एस.एस. मिरजकर यांची भाषणे झालीच पाहिजेत असा आग्रह धरला. सभेचे अध्यक्ष लट्ठे यांनी सभेतील गोंधळामुळे काढता पाय घेतला. तरीपण शेतकऱ्यांचा गोंधळ थांबेना. शेवटी कॉ. देशपांडे व कॉ. मिरजकर यांची भाषणे झाल्यावर शेतकरी शांत झाले. मात्र असे प्रकार वारंवार होऊ लागल्यामुळे कम्युनिस्टांचे वर्चस्व वाढते हे ध्यानात घेऊन शेतकऱ्यांच्या परिषदा कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून घेऊ नयेत असे फर्मान कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी काढले.[१३] पण या उपायांनी शेतकऱ्यांमधील असंतोष दडपणे व कम्युनिस्टांच्या चळवळीला पायबंद घालणे कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना शक्य झाले नाही. कॉंग्रेस व कम्युनिस्ट पक्षातील नेते व कार्यकर्ते आता उघडपणे वैचारिक संघर्षाची भूमिका घेऊन एकमेकांना शह-काटशह देऊ लागले.

## निष्कर्ष :

पब्लिक सेफ्टी बिलाचा आधार घेऊन कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांना दडपून टाकण्यासाठी ब्रिटिश सरकारने कॉम्रेड एस.एस.मिरजकर व कॉम्रेड एस.व्ही.देशपांडे यांना नगर जिल्ह्यात ब्रिटिशांनी कैद केले खरे. मात्र त्यांनी१९३४ ते १९३८ पर्यंत अहमदनगर जिल्ह्यात स्थानबद्धतेच्या काळात अहमदनगर व शेवगावच्या जनतेत कम्युनिस्ट पक्षाची विचारसरणी व कार्यक्रम रुजविण्याच्या प्रक्रियेचा पाया घातला. जिल्ह्यातील तरुणांना मार्क्सवादाची दीक्षा देऊन त्यांना कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीकडे आकृष्ट करण्याचे काम या दोन कम्युनिस्ट नेत्यांनी केले. या दोघांना कम्युनिस्ट पार्टीचे प्रत्यक्ष काम करता आले नाही. तरीपक्षाच्या कार्यक्रमाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी कॉंग्रेसच्या व्यासपीठाचा उपयोग केला.मात्र कॉंग्रेस व कम्युनिस्ट या दोन्ही पक्षांची विचारसरणी भिन्न असल्यानेया दोन्ही पक्षाच्या नेत्यांमधील विसंवाद वाढू लागल्याचे

दिसून येते. त्यामुळे कॉम्रेड एस.एस.मिरजकर व कॉम्रेड एस.व्ही.देशपांडे यांना एकाच वेळी कॉंग्रेस व ब्रिटिश सरकारच्या विरोधाला तोंड देऊन आपल्या पक्षाचा अजेंडा जिल्ह्यात रुजविण्याची कामगिरी करावयाची होती. ती त्यांनी यशस्वीपणे पार पाडून शेतकरी वर्गात कम्युनिस्ट पक्षाचा विचार रुजविण्याचे कार्य तडीस नेले. स्थानबद्ध करून कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रसार थांबवता येईल हा ब्रिटीशांचा हेतूच त्यांनी विफल करून टाकलातसेच कॉंग्रेसच्या भांडवलशाही राजकारणावर टिका करून शेतकरी-कामगारांच्या प्रश्नावर घेतलेली कणखर भूमिका यामुळे कॉंग्रेस मधील तरुण वर्गही कम्युनिस्ट पक्षाकडे आकृष्ट होऊ लागला.

## संदर्भ ग्रंथ सूची


१. labor_monthly/ 1934/ 06/xol.htm, last seen at 10/01/2019. https:// www.marxists. org / history / international/ commintern/ sections/ Britain/ periodicals/

२. मिरजकर एस.एस., "अंधारातून प्रकाशाकडे" लोकवाड्मय गृह प्रकाशन, मुंबई, १९८०, पृ. क्र. १०१.

३. आवटे लीला, "एका समर्पिताची जीवनयात्रा - कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे (मास्तर)," प्रकाशक, प्रकाशक कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, रेड फ्लग बिल्डिंग, बिंदू चौक, कोल्हापूर, २०१०, पृ.क्र.१७.

४. वैद्य प्रभाकर (संपा.), "आमचे मास्तर- कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे स्मृती गौरव ग्रंथ," अभिनव प्रकाशन, मुंबई १९६१, पृ. क्र. १२८ ते १३१.

५. कुलकर्णी शांताबाई, "अपुरी कहाणी-कॉ.डी.बी.कुलकर्णी यांच्या आठवणी," अभिनव प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती, जुलै १९७६, पृ. क्र. ६६.

६. कॉम्रेड भालचंद्र कांगो, "मुलाखत दि. ३१/०१/२०१६," सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्ष, भा.क.प., कार्यालय, भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, वरळी, मुंबई

७. वैद्य प्रभाकर (संपा.), "आमचे मास्तर-कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे स्मृती गौरव ग्रंथ," उपरोक्त, पृ. क्र. १२८ ते १३१.

८. आवटे लीला, "एका समर्पिताची जीवनयात्रा-कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे (मास्तर)," उपरोक्त, पृ. क्र. १८-१९.

९. मालिनी तुळपुळे, "कॉ. वसंतराव तुळपुळे कार्य व परिचय," शलाका प्रकाशन, अंधेरी, मुंबई डिसेंबर १९८९, पृ. क्र. ११.

१०. वैद्य प्रभाकर (संपा.), "आमचे मास्तर- कॉम्रेड एस.व्ही. देशपांडे स्मृती गौरव ग्रंथ," उपरोक्त, पृ. क्र. १३० -१३१.

११. मिरजकर एस.एस., "अंधारातून प्रकाशाकडे" उपरोक्त, पृ. क्र. ११४ ते ११६.

१२. औटी विद्याधर भास्करराव,'पारनेरचा पोलादी कम्युनिस्ट आमदार कॉ. भास्करराव औटी',प्रतिमा पब्लिकेशन्स, अहमदनगर,जून २००४, पृ. क्र. ३.

१३. लाड श्रीकांत (संपा.),'भारतीय कम्युनिस्ट पक्षाची ५० वर्षे', भारतीय कम्युनिस्ट पक्ष प्रकाशन, मुंबई जानेवारी १९७६, पृ. क्र. ४४.